SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 **website : www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९०० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ **E-Mail : statcell@unishivaji.ac.in**
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/ कार्यशाळा/कोल्हापूर/ No 869 – दिनांक : 24 JAN 2018

परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्रापत संस्था,

कोल्हापूर जिल्हा.

विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहण्याबाबत....

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, कोल्हापूर जिल्हयातील संलग्नित महाविद्यालयांतील नोडल अधिका-यांरीता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळा **दिनांक ०७/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर** येथे आयोजीत केलेली आहे. सदर कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयातील एआयएसएचई व एमआयएस चे काम पाहणा-या नोडल अधिका-यांनी उपस्थित रहावे. सदर कार्यशाळेमध्ये एआयएसएचई व एमआयएस चे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळेस उपस्थित राहणा-या नोडल अधिका-यांची कार्यरत रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यानी मंजूर करावी. उपस्थित असलेल्या नोडल अधिका-यांचा दैंनिक व प्रवास भत्ता विद्यापीठ अथवा शासनाकडुन प्रतिपूर्ती होणार नाही याची नोंद घ्यावी. (**सदरची कार्यशाळा ही कोल्हापूर जिल्हयातील महाविद्यालयांसाठी आयोजित केलेली आहे.**) सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या एआयएसएचई व एमआयएस चे काम पाहणा-या नोडल अधिका-यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. याची कृपया आपण नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव